दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २६६ वा | शनिवार दि. २२ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## धुळे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची बदली

**धुळे ।** धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून गेल्या दीड ते दोन वर्षांपासून कामकाज बघणारे जलज शर्मा यांची बदली झाली असून



यांच्या जागी अभिनव गोयल यांची धुळे जिल्हा अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. नव्याने नियुक्त झालेले जिल्हाधिकारी यांच्याकडून देखील धुळेकरांना मोठ्या अपेक्षा असणार आहेत. तसेच धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेस्वरी यांची वाशीम येथे बदली झाली आहे तर प्रांतधिकारी तुप्ती घोडमिसे यांची सांगली येथे बदली करण्यात आली आहे.

## न्यूज कॉलम

### गोमांसाची वाहतूक करणारे दोघे ताब्यात

**धुळे ।** ताराष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील मालेगाव-धुळे रस्त्यावर एका ॲपरिक्षाचा संशय आल्याने तपासणी केली असता या ॲपरिक्षात गोमांसाची वाहतूक होत असल्याचे मोहाडी पोलिसांच्या निदर्शनास आले. या कारवाईत एकूण १ लाख ४ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. धुळे शहरा दरम्यान असलेल्या हॉटेल एम.एच.१८ समोरील रस्त्यावर एम.एच.४१/ए.टी.३९०८ या ॲपेरिक्षातून गोमांसाची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. सैय्यद अयाज सैय्यद हसु रा.मोबिनपुरा, मालेगाव या चालकाकडे चौकशी केली असता त्याच्याकडे कुठलाही अधिकृत परवाना आढळून आला नाही.

### शेतीचे नुकसान; चौघांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** साक्री मांजरी (ता. साक्री) शिवारात भाताचे शेत व सोयाबीनचा चारा जाळण्यात आला. यात महिला शेतकरी सिंधूबाई अनिल पवार यांचे नुकसान झाले. रोग्या लहानू चौधरी, गुलाब सोनू चौधरी, तुकाराम बारकू चौधरी, पोपट काळू चौधरी यांनी हे नुकसान केले, असे तक्रारीत नमूद आहे. चौघा संशयितांविरुद्ध ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

# गावठी बनावटीच्या पिस्तुलांसह दोन जण पोलिसांच्या ताब्यात

**धुळे । प्रतिनिधी**

शिरपूर तालुका पोलिसांनी अवैधपणे गावठी कट्टे व जिवंत कारतूस बाळगून असलेल्या दोघा जणांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. त्यांच्याकडून चार गावठी बनावटीचे पिस्तूल व सात जिवंत कारतूस पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

शिरपूर शहराकडे गावठी बनावटीचे पिस्तोल आपल्यासोबत अवैधपणे बाळगून दोन ईसम जात असल्याची खात्रीलायक माहिती सूत्राकडून शिरपूर तालुका पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या अनुषंगाने शिरपूर तालुका पोलिसांनी तात्काळ पथक तयार करून तैनात केले. पोलिसांना संशयित दोन जण मिळालेल्या माहितीनुसार आढळून आले. एपीआय खलाणे यांनी तातडीने आपल्या पथकाला हाडाखेड टोलनाका येथे रवाना केले. हाडाखेड शिवारात सीमा तपासणी नाक्याजवळ पथकाने दोघा इसमांचा शोध घेतला. यावेळी मुंबई-आग्रा महामार्गावरील ब्लॅक हार्ट रेस्टॉरंटच्या समोर रात्री १० वाजेच्या सुमारास दोन्ही संशयीत इसम हे पायी येताना दिसले. त्यांच्या हालचाली संशयीत वाटल्याने पथकाने त्यांना हटकले. पोलीस आल्याचे पाहुन दोघे संशयीतांनी तेथून पळू लागले. यावेळी पथकाने पाठलाग करुन शिताफिने त्यांना पकडले. दोघा संशयीतांना त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी निलेश हनुमंत गायकवाड (३०) रा.वडगाव हवेली ता.कराड, जि.सातारा व मनिष संजय सावंत (२२) रा.सोमवार पेठ, कराड ता.सातारा असे सांगितले.

पथकाने त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे १ लाख ८० हजार रुपये किमतीचे ०४ गावठी पिस्टल (मॅगझीनसह), १० हजार रुपये किमतीचे ०२ अतिरिक्त मॅगझिन व सात हजार रुपये किमतीचे ०७ जिवंत राऊंड असा एकूण १ लाख ९७ हजारांचा ऐवज जप्त केला. या दोघांनी सदर शस्त्रे मध्यप्रदेशातील बडवाणी येथून विकत घेतल्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात पोकॉ इसरार फारुकी यांच्या फिर्यादीवरुन वरील दोघांविरुध्द आर्म ॲक्ट कलम ३/२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पीएसआय कृष्णा पाटील यांना सोपवण्यात आला आहे. दरम्यान, या दोघांनी कुठल्या उद्देशाने शस्त्रे घेतली होती? यापुर्वीही त्यांनी शस्त्रे घेतली आहे का? किंवा विक्री केली आहेत का? शस्त्र पुरवठ्याचे कोणते रॅकेट आहे का? याची चौकशी केली जाणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी दिली आहे. कारण काही दिवसांपुर्वी ठाणे पोलिसांनी सांगवीत कारवाई करुन मोठा शस्त्रसाठा जप्त केला होता. कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी एपीआय जयेश खलाणे, पीएसआय संदीप पाटील, सुनिल वसावे, मंगला पवार, पोना संदीप ठाकरे, इसरार फारुकी यांच्या पथकाने केली.



### एसपींकडून दहा हजारांचा रिवार्ड

**या कामगिरीबद्दल एसपी संजय बारकुंड यांनी पथकाचे कौतुक करत पथकाला दहा हजारांचे बक्षिस जाहीर केले. दरम्यान, पुढील वर्षी धुळे जिल्ह्यासह महाराष्ट्र व मध्यप्रदेशमध्ये निवडणुका आहेत. त्यामुळे जिल्ह्यात कडक नाकाबंदी करण्यात आली असून लवकरच बॉर्डर मिटींग तसेच नंदुरबार, धुळे, जळगांव बडवाणी पोलिसांसोबतही मिटींग घेणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी यावेळी दिली.**

### दोन लाखाचा मुद्देमाल जप्त

**पोलिसांनी तात्काळ या दोघांना थांबवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे चार गावठी बनावटीचे पिस्तोल व सात जिवंत कर्तुस पोलिसांना आढळून आले आहे. पोलिसांनी तात्काळ या दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून या कारवाईदरम्यान जवळपास एक लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल देखील हस्तगत केला आहे, तसेच पुढील तपास शिरपूर तालुका पोलीस करीत आहेत.**

## इर्शाळवाडी दुर्घटनेत आतापर्यंत २० जणांचा मृत्यू

# ११९ जणांना वाचवण्यात यश : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**

विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सध्या सुरू असून आज कामकाजाचा पाचवा दिवस आहे. सभागृहात सदस्यांनी काही लक्षवेधी सूचना मांडणार आहेत. त्याच बरोबर काही विधेयके देखील सादर करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यात झालेल्या दुर्घटनेवरही आज सभागृहात चर्चा होण्याची शक्यता आहे. मात्र, सुरूवातीलाच विरोधी पक्षातील महिला आमदारांनी मणिपूर घटनेवर चर्चा करण्याची मागणी केली. त्यामुळे सभागृहात गोंधळ झाला. विरोधकांनी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

इर्शाळवाडी दुर्घटनेतील बळींचा आकडा आता २० वर पोहोचला आहे. बुधवारी रात्री घडलेल्या या घटनेतील आतापर्यंत ११९ जणांना वाचवण्यात यश आले आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी मंत्री गिरीश महाजन व आपल्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचेही कौतुक केले. एकनाथ शिंदे म्हणाले की, सतत पडणारा पाऊस आणि चिखल, धुक्यांमुळे बचावकार्यात अडथळे येत होते. राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी त्या ठिकाणी जाऊन बचाव कार्याचा आढावा घेतला. त्या ठिकाणी अजून काही लोक अडकल्याची शक्यता आहे. राज्य सरकारच्या यंत्रणेसोबत स्वयंसेवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या बचत कार्यात मदत केली. गुरूवारी दिवसभरात एकूण ११९ लोकांना वाचवण्यात यश आलं. नैसर्गिक आपत्ती असल्याने राज्य सरकारपुढे काही मर्यादा आहे. आतापर्यंत या घटनेत २० जणांचा मृत्यू झाला आहे तर आठ जण जखमी झालेत. मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लाखांची मदत देण्यात येत आहे.

या ठिकाणी बचाव कार्य सुरू असून लोकांना धीर देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. घटना घडल्यापासून दोन तासांच्या आत आपली यंत्रणा त्या ठिकाणी पोहोचली, गिरीश महाजनांचे विशेष काम आहे. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी या ठिकाणी राहून विशेष लक्ष देत आढावा घेतला. या सर्वांमुळे बचाव कार्यामध्ये गती आली, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



### अवघड व चढणीचा रस्ता

**मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, आपण गेल्यामुळे यंत्रणा हलते, अलर्ट होते. पण इर्शाळवाडी गावाकडे जाणारा रस्ता अत्यंत अवघड व चढणीचा आहे. तिकडे जाण्याची इच्छा असल्यामुळे मी डोंगर चढण्यास सुरुवात केली. पण एका स्टेजला जाऊन मलाही हे गाव किती उंचीवर आहे आणि रस्ता किती चढणीचा आहे याची जाणीव झाली. तेथील परिस्थिती भयंकर होती. मी रस्ता चढताना विचार केला की, जी लोकं वरती साहित्य घेऊन जात आहेत, त्यांना सलामच केला पाहिजे. कारण हा रस्ता चढणे अत्यंत कठीण होते.**

# कटक मंडळांना नगरपालिका अथवा नगरपरिषद म्हणून घोषित करावे

**खा.गोडसे यांची मुख्यमंत्र्यां पाठोपाठ केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे मागणी**

**देवळाली । प्रतिनिधी**



कटक मंडळांकडे पुरेसा निधी नसल्याने कटक मंडळाकडून त्या शहरांचा हवा तसा विकास होत नाही. अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविल्या जात नाहीत. कटक मंडळांच्या कामात सुधारणा करण्यासाठी कटक मंडळे नगरपालिका, नगरपरिषद म्हणून घोषित करण्याची आग्रही मागणी काल खा. हेमंत गोडसे यांनी केंद्रिय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे केली आहे. राज्य शासनाचा अभिप्राय येताच आपल्या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याची ग्वाही ना. राजनाथ सिंह यांनी दिली आहे.

राज्यात सात ठिकाणी कटक मंडळे असून त्यापैकी देवळाली कॅम्प एक आहे. कटक मंडळाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर लष्कराचे क्षेत्र असते. त्या क्षेत्रावर लष्कराचा ताबा असल्याने अनेकदा त्यांच्या गोपनीय कारभाराचा फटका नागरिकांना बसत असतो. अशातच कटक मंडळांकडे पूरेसा निधी उपलब्ध नसल्याने हवा तसा विकास होत नाही. परिणामी स्थानिक रहिवाशांची मोठी कुचंबा होत असते. यातून मार्ग काढण्यासाठी कटक मंडळे नगरपालिका किंवा नगरपरिषदेत म्हणून घोषित करण्यासाठी विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह देवळाली कॅम्प येथील स्थानिक रहिवाशांनी खा.हेमंत गोडसे यांच्याकडे तगादा लावला होता. या अनुषंगाने खा. गोडसे यांनी मागील आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत कटक मंडळे नगरपालिका किंवा नगरपरिषद म्हणून घोषित करण्याचे साकडे घातले होते.

यातूनच काल खा.गोडसे यांनी दिल्लीत जावून केंदियमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. कटक मंडळे नगरपालिका किंवा नगरपरिषद म्हणून घोषित करण्याचा निर्णय केंद्राच्या विचारधीन आहे. यासाठी केंद्राने राज्यशासनाकडे अभिप्राय मागितलेला आहे. गरज पडल्यास कटक मंडळाच्या हद्दीत असलेले लष्कराचे क्षेत्र वगळून इतर रहिवाशी झोन नगरपालिका किंवा नगरपरिषद म्हणून घोषित करण्याची आग्रही मागणी खा.गोडसे यांनी ना. राजनाथ सिंह यांच्याकडे केली आहे. या अनुशंगाने खासदार गोडसे यांनी प्रतिनिधीक म्हणून देवळाली कॅम्प कटक मंडळाचे उदाहरण दिले.

# ट्रकच्या धडकेत एक ठार, दोन जखमी

**सोनगीर । प्रतिनिधी**

मुंबई आग्रा महामार्गावरील वाघाडी फाट्यावर मोटारसायकलला ट्रकने धडक दिल्याने एक विवाहिता ठार आणि तिचा पती व मुलगा जखमी झाले आहेत. ही घटना शुक्रवारी (ता. २१) सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली.

शोभाबाई बारकु भील (वय २५, रा.मोहाडी प्र डांगरी ह. मु. मुडी प्र डांगरी ता. अमळनेर जि. जळगाव) असे मयताचे नाव आहे. बारकू झुलाल भील (वय २६) हा त्याची पत्नी शोभाबाई व मुलगा संग्राम (वय ४ वर्षे) असे तीघे बुरझड (ता. धुळे) येथे मोटार सायकलने (क्रमांक एमएच ३९ एए ५१३५) त्याचा साडु राजु भील यास भेटण्यास गेले होते. ती मोटार सायकल मुडी गावातील हिरालाल पाटील यांच्या मालकीची असुन ती तात्पुरती वापरण्यासाठी घेतली होती. शुक्रवारी सकाळी बारकू भील, शोभाबाई व संग्राम हे बुरझड येथून मोटार सायकलने परत



मुडीला जातांना वाघाडी फाट्यावर महामार्ग धुळ्याकडून वेगाने येणाऱ्या ट्रकने ( आरजे ११ जीबी ३८०१) मोटारसायकलला जोरदार धडक दिली. बारकूला डाव्या खांद्याला व संग्रामला पायाला मार लागला. धडक देऊन ट्रक चालक पुढे थांबला. सोनगीर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय अधिकारींनी शोभाबाईला तपासून मयत घोषीत केले. चालक पवनकुमार ग्यानसिंग (रा. खौरपूरा ता. बसेरी जि धौलपुर, राजस्थान) यास ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. गुन्हा दाखल झाला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# मोटर सायकल व मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

येथील पोलिसांनी मोटरसायकल व मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीस अटक केलीअसून त्याकडून दोन मोटरसायकल व आठ मोबाईल असा एकूण १ लाख ७६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

वालखेडा येथील रहिवासी भूपेंद्र कैलास महाजन यांनी त्यांची मोटरसायकल (क्र.एम एच १८ बीटी ८६३५) दि.१५ रोजी दोंडाईचा येथील रानफुल कॉलनीतील विठ्ठल मंदिराजवळ घरासमोर लावली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरली होती याप्रकरणी दोंडाईचा पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच दि. १७ रोजी दोंडाईचा शहरात नंदुरबार चौफुली येथे पोलीस उपनिरीक्षक दिनेश मोरे, पोलीस कॉन्स्टेबल अनिल धनगर, चालक नरेंद्र शिरसाठ असे नाकाबंदी करीत असताना एक मोटरसायकलवर दोन इसम दिसले त्यांना थांबवले त्यांच्याकडे मोटरसायकल क्रमांक एम एच १८ बी डब्ल्यू १७०५ अशी मिळून आली., त्यांना इतक्या रात्री कुठे जात आहे, याबाबत विचारणे केली. तेव्हा त्यांने उडवाउडवीचे उत्तर दिले. एकाचे नाव राजेंद्र नाना ठाकरे असे असून त्याच्या सोबत एक बालक होता. गाडीचे कागदपत्र बाबत विचारणा केले असता घरी असल्याचे सांगितले.



त्याच्यावर संशय आल्याने त्यांना पोलीस ठाणे येथे आणून त्यांची विचारपूस केली असता त्यांनी ती मोटरसायकल चोरी करून आणले बाबत सांगितले. तसेच त्यांचे अंग झडती घेतली असता त्यांच्याकडे पाच वेगवेगळ्या कंपनीचे २ मोबाईल मिळून आले. पोलीस कस्टडी दरम्यान आरोपीने तीन मोबाईल फोन व एम एम एच १८ बीटी ८६३५ गुन्हा दाखल असलेले मोटरसायकल काढून दिली. तसेच आरोपीकडून एम एच १८ ब्युटी ८६३५ व एम एच १८ बी डब्ल्यू १७०५ मोटरसायकल व आठ वेगवेगळ्या कंपनीच्या मोबाईल असे एकूण १ लाख ७६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाने व पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांच्या सूचनेप्रमाणे उपनिरीक्षक दिनेश मोरे, पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण निंबाळे, पुरुषोत्तम पवार, अनिल धनगर, लखन कापुरे, हर्षद बागुल, चालक नरेंद्र शिरसाठ यांनी केली.

# स्लॅब फोडून बँकेत चोरीचा प्रयत्न सायरनच्या आवाजाने फसला

**अंबड औद्योगिक वसाहतीतील घटना**

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील गुन्हेगारी वाढतच असून आता दरोड्याची मोठी घटना पोलिसांच्या समयसूचकतेमुळे टळली आहे. शहरातील अंबड औद्योगिक वसाहतीतील इंडियन बँकेत हा प्रकार घडला आहे. इंडियन बँकेतील अधिकारी व कर्मचारी गुरुवारी सकाळी नियमित वेळेत बँकेत पोहोचल्यानंतर त्यांना ही घटना समजल्यानंतर त्यांनी तत्काळ लॉकर व रोकडच्या तिजोरीची तपासणी केली. मात्र, बँकेतील कोणतीही मौल्यवान वस्तू अथवा रक्कम चोरी झाली नसल्याचे प्रथमदर्शनी अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. मध्यरात्रीच्या सुमारास चोरांनी बँकेत पाठीमागून खिडकीचे ग्रील कापून प्रवेश करत बँकेतील रोकड चोरण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी बँकेतील लॉकर रूमच्या वरचा स्लॅबही फोडला. त्यामुळे या भागातून रात्रीच्या वेळी पोलिसांच्या गस्ती पथकाच्या वाहनाच्या सायरनचा आवाज कानावर पडल्याने चोरांनी बँकेतून पळ काढला असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंबड औद्योगिक वसाहतीतील महामार्गालगत असलेल्या इंडियन बँक येथे अज्ञात चोरांनी लॉकर असलेल्या स्ट्रॉंगरूमवरील स्लॅब मशीनच्या साहाय्याने फोडला. त्यानंतर आतील लॉकरही फोडले. इंडियन बँकेत चोरांनी गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास टाकलेल्या दरोडा हा बँकेची संपूर्ण रेखी करूनच टाकण्यात आल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. बँक अधिकारी व कर्मचारी आल्यानंतर नेहमीप्रमाणे सकाळी बँक उघडल्यानंतर बँकेच्या स्ट्रआँगरुममध्ये काही कर्मचारी गेल्याने छताला पडलेले भगदाड बघताच बँकेत दरोडा टाकण्यात आल्याचे त्यांच्या लक्षात आले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर सकाळी पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, प्रशांत बच्छाव, सहायक आयुक्त सीताराम कोल्हे, शेखर देशमुख, अंबड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक प्रमोद वाघ, चुंचाळे पोलिस चौकीचे वरिष्ठ निरीक्षक मनोहर करंदे, गुन्हे शाखा युनिट २ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रणजित नलावडे यांच्यासह गुन्हे शोध पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी फॉरेन्सिक टीम व श्वानपथकाला पाचारण केले.



### रोकड वाचली

**दरम्यान बँकेत चोरांनी दरोडा टाकल्याचे समजताच बँकेत एकच धावपळ उडली. मात्र, काही वेळातच बँकेतून कोणतीही चोरी झाली नसल्याचे लक्षात आल्याने अधिकाऱ्यांना दिलासा मिळाला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा पोलिस उपआयुक्त प्रशांत बच्छाव, परिमंडळ दोनचे पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, सहायक आयुक्त गुन्हे सीताराम कोल्हे, शेखर देशमुख, वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ, मनोहर करंदे, गुन्हे शाखा युनिट दोनचे रणजित नलावडे यांच्यासह गुन्हे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते, त्यांनी फॉरेन्सिक टीम व श्वानपथकाला पाचारण करत बँकेत चोरट्यांचे ठसे व अन्य काही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.**

# विजेचा शॉक लागून सुनेसह सासुचा दुर्दैवी मृत्यू

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री रोडवरील महिंदळे शिवारातील बजरंग सोसायटीत काल रात्री अत्यंत दुर्दैवी घटना घडली. घरातील तारेवर ओले कपडे टाकत असतांना तारेत विद्युत प्रवाह असल्याने विजेचा शॉक लागून सुनेसह सासूचा मृत्यू झाला. याबाबत धुळे तालुका पोलिसात नोंद झाली आहे.

शोभाबाई कृष्णा झीने (वय ३९) व रुखमाबाई पांडुरंग झीने (वय ६५ रा.प्लॉट नं.५४, बजरंग सोसायटी, महिंदळे शिवार, साक्री रोड, धुळे) अशी मयत सुन व सासुचे नाव आहे. शोभाबाई घरातील ओले कपडे तारेवर टाकत होती. परंतू तारेत विद्युत प्रवाह असल्याने शोभाबाई हिस विजेचा धक्का लागला. तेव्हा तिची सासू रुखमाबाई ही तेथेच जमिनीवर बसलेली असतांना शोभाबाई ही तारेसह रुखमाबाई यांच्या अंगावर पडली. त्यामुळे रुखमाबाई यांनाही विजेचा धक्का बसला. त्यात दोघीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना लक्षात येताच परिसरातील नागरिकांना धाव घेत घरातील विज प्रवाह बंद करुन दोघींना बाजुला केले. घटनेची माहिती मिळताच धुळे तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद पाटील, उपनिरीक्षक राजश्री पाटील व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होत.

## ही ‘माणसे’ आहेत?

मणिपूरमध्ये महिलांवरील अत्याचाराची घटना कळल्यावरही मुख्यमंत्री बिरेन सिंग गप्प का बसले? ते मैतेई समाजाचे आहेत म्हणून का? केंद्रीय गृहखात्याने त्यांना जाब का विचारला नाही?

मणिपूरमध्ये सुमारे दोन महिन्यांपूर्वी जे घडले त्याची धक्कादायक चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसृत झाली आणि देश अक्षरशः हादरला. हा देश किंवा किमान त्यातील काही भाग मध्य युगात वावरत आहे काय? असे या घटनेमुळे वाटत आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील या घटनेची तातडीने दखल घेत, सरकारने कारवाई केली नाही, तर आम्ही करू असा इशारा दिला. मणिपूरमध्ये पोलिस, राज्य सरकार या संस्था आहेत की नाहीत? असा प्रश्न यामुळे उपस्थित झाला आहे. मणिपूरमध्ये दोन महिलांना विवस्त्र करून पुरुषांच्या जमावाने त्यांची धिंड काढली. त्यांना जवळच्या शेतात नेऊन त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. धिंड काढण्याचे निर्लज्जपणे चित्रीकरण करण्यात आले; पण कोणीही त्या महिलांना वाचवण्याचा प्रयत्नही केला नाही, दोन महिन्यांनंतर या घटनेबद्दल केवळ एकास अटक झाली, हा सर्व प्रकार देशास मान खाली घालायला लावणारा आहे. एका पीडितेने पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीतून अधिक भीषण बाबी समोर आल्या आहेत. तरीही पोलिस, राज्याचे मुख्यमंत्री स्वस्थ का बसले? चित्रफीत समोर आल्यावर देशभर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या; पण आता त्या मुद्द्यावर राजकारण सुरु होत असल्याचे दिसत आहे, ते जास्त खेदजनक आहे.

राजकारण नको, कारवाई हवी

मणिपूरमध्ये तीन मे रोजी हिंसाचार उसळला. इम्फाळ लगतचा खोर्‍याचा भाग आणि डोंगराळ भागातील रहिवाशांत संघर्ष सुरु झाला. त्याच्या दुसर्‍या दिवशी, चार मे रोजी ही असभ्य घटना घडली. चित्रफितीमध्ये एक २० वर्षांची तरुणी, एक चाळिशीतील स्त्री अशा दोन महिलांना विवस्त्रावस्थेत नेण्यात येत असल्याचे, अनेक पुरुष त्यांची विटंबना करत असल्याचे दिसत आहे. एका पीडितेच्या तक्रारीनुसार सुमारे पन्नाशीच्या आणखी एका महिलेलाही जमावाने ताब्यात घेतले व तिलाही विवस्त्र केले. शेतात तरुणीवर जमावाने क्रूरपणे बलात्कार केला. हे घडण्याआधी सुमारे हजार जणांचा सशस्त्र जमाव एका गावावर चाल करून गेला. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रे होती. त्यांनी गावात लुटालूट व जाळपोळ सुरु केली. त्यामुळे या तीन महिलांसह पाचजण जंगलाच्या दिशेने पळाले. पोलिस तेथे पोहोचले, त्यांनी या महिलांची सुटका केली; पण पोलिस स्टेशनपासून जेमतेम दोन किलोमीटर अंतरावर जमावाने या महिलांना पोलिसांच्या ताब्यातून हिसकावून घेतले. नंतर त्यांची धिंड काढून अत्याचार केले. ‘धक्कादायक’ म्हणून या सर्व प्रकाराकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पोलिस यंत्रणेचे अपयश यातून दिसते. या महिला कांग्पोक्पी या डोंगराळ भागातील आहेत. तेथे कुकी-झोमी या आदिवासी समाजाची लोकसंख्या जास्त आहे. मात्र, अत्याचार घडला त्या भागात मैतेई समाजाचे वर्चस्व आहे. म्हणजे कुकी समाजाला ‘धडा’ शिकवण्यासाठी समाजातील काही जणांनी हे कृत्य केले असा अर्थ घ्यायचा का? मणिपूरमध्ये सुमारे दोन महिने हिंसाचार सुरु आहे. मात्र, बिरेन सिंग यांचे मुख्यमंत्रिपद शाबूत आहे. या प्रकरणाची चौकशी सुरु असल्याचे त्यांनी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांना सांगितले. एवढ्याने ते जबाबदारीतून मोकळे कसे होतात? दोन महिन्यांत केंद्र सरकारने त्यांना एकदाही जाब का विचारला नाही? विरोधी पक्षांनी दोन महिने सतत विचारणा करूनही सरकार गप्प बसले. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मणिपूरचा मुद्दा गाजणार हे नक्की. मात्र, त्यावर उत्तर देण्याऐवजी, पश्चिम बंगालमध्ये पंचायत निवडणुकीच्या काळातील हिंसाचार, राजस्तानात झालेली एका कुटुंबाची हत्या; हे मुद्दे काढून विरोधकांना निरुत्तर करण्याचा विचार सत्ताधारी पक्ष करत आहे. हे अधिक गैर आहे. मणिपूरमधील हिंसाचार ही केवळ कायदा व सुव्यवस्थेची समस्या नाही. तो वांशिक द्वेषाचा प्रश्न बनला आहे. येथे राज्य सरकार या घटनात्मक संस्थेचे व व्यवस्थेचे अपयश हा मोठा मुद्दा आहे. हिंसाचार सुरु होताच तो शमवण्यात सरकार कमी पडले हे स्पष्ट झाले आहे. समोर आलेली घटना ‘पाशवी’ म्हणता येणार नाही. पशु कधीही माद्यांची धिंड काढत नाहीत. पोलिस व राज्य यंत्रणेला धाब्यावर बसवण्याची हिंमत करणार्‍या नराधमांना ‘माणूस’ तरी कसे म्हणावे?

# सामरिक सहकार्याची पंचविशी

**पंतप्रधान मोदींचे फ्रान्समध्ये झालेले स्वागत आणि त्यांना तिथे मिळालेला सन्मान केवळ पंतप्रधानांचाच नव्हे तर भारतासाठी गौरवशाली क्षण होता. याद्वारे फ्रान्सने भारताच्या महाशक्ती म्हणून होणाऱ्या उदयाची जणू पावतीच दिली. भारताची सामरिक शक्ती आणि जगभरातील महत्त्व वाढवण्यात पंतप्रधान मोदींचा गेल्या नऊ वर्षांतील कालखंड महत्त्वाचा आहे. फ्रान्सने त्याची जाण दाखवून देणे महत्त्वाचे म्हणावे लागेल.**



या वर्षी भारत आणि फ्रान्स सामरिक सहकार्याची पंचविशी आहे. दोन्ही राष्ट्रांमध्ये सामरिक सहकार्य सुरू झालेल्याला २५ वर्षे झाली. त्यानिमित्ताने पंतप्रधान मोदींनी फ्रान्सच्या राष्ट्रीय दिवशी म्हणजे बॅस्टिल डेला (१४ जुलै) फ्रान्सला भेट दिली. हा दिवस फ्रान्ससाठी प्रजासत्ताक दिनासारखा असतो आणि त्यानिमित्ताने पॅरिसमध्ये भव्य लष्करी संचलन आयोजित केले जाते. या वर्षी पंतप्रधान मोदींना या समारंभाचे खास अतिथी म्हणून बोलावण्यात आले होते, हा केवळ पंतप्रधानांचाच नव्हे तर भारतासाठीही गौरवशाली क्षण होता. याद्वारे फ्रान्सने भारताच्या एक महाशक्ती म्हणून होत असलेल्या उदयाची जणू पावतीच दिली आहे. भारताची सामरिक शक्ती आणि जगभरातील महत्त्व वाढवण्यात पंतप्रधान मोदींचा गेल्या नऊ वर्षांतील कालखंड महत्त्वाचा राहिला आहे. त्याची जाणीव करून देण्यासाठी फ्रान्सने पंतप्रधानांना आपला सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान पुरस्कार दिला. अमेरिकेच्या यशस्वी दौऱ्यापाठोपाठ नुकतीच पंतप्रधान मोदींची फ्रान्स भेट झाली; परंतु भारत-अमेरिका आणि भारत-फ्रान्स हे दोन्ही संबंध अगदी वेगळ्या पातळीवर आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. भारत-अमेरिकेदरम्यानचे संबंध स्वातंत्र्यानंतरची जवळपास ५० वर्षे कधी सामान्य तर कधी तणावाचे राहिले आहेत. याउलट आपले फ्रान्सबरोबरचे संबंध गेली ७५ वर्षे अत्यंत मित्रत्वाचे आणि सौहार्दाचे राहिलेले आहेत, हा फार मोठा फरक लक्षात घ्यायला हवा. १९६० च्या दशकात फ्रान्सचे अध्यक्ष डिगॉल यांनी अमेरिका आणि रशिया या दोन्हीपासून वेगळे असे स्वतंत्र धोरण अवलंबायला सुरुवात केली. तेव्हापासूनच जागतिक महाशक्तींपासून दूर राहून भारताप्रमाणेच फ्रान्सनेही आपली स्वतंत्र भूमिका मांडायला सुरुवात केली. त्यामुळे जागतिक स्तरावर भारत आणि फ्रान्सचा महाशक्तींच्या सत्तासंघर्षाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एकच राहिला आहे. भारत-फ्रान्स संबंध या मुख्य सिद्धांताच्या भक्कम पायावर उभे आहेत हे लक्षात घ्यायला हवे. १४ जुलैच्या पॅरिसमधल्या लष्करी संचलनात भारतीय सेनेची तुकडीदेखील आघाडीवर होती. पहिल्या महायुद्धात जर्मनीविरुद्ध लढताना हजारो भारतीय सैनिक फ्रान्सच्या भूमीवर कामी आले. फ्रेंच लोकांना त्याची जाणीव आहे आणि भारतीय सैनिकांच्या या त्यागाबद्दल कृतज्ञता हा देखील भारत-फ्रेंच संबंधांमधला एक मोठा दुवा आहे. दुर्दैवाने भारताच्या पूर्वीच्या सरकारांनी भारतीय सैन्याच्या पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातील कामगिरीकडे डोळेझाक करण्याचे ठरवले आणि त्यामुळे भारताच्या परराष्ट्र संबंधात मजबुती आणणारा एक मोठा मुद्दा आपण सोडून दिला. मोदी सरकारने हे जुने धोरण बदलून भारताच्या पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातल्या कामगिरीचे श्रेय देशाला मिळवून देण्यास सुरुवात केली आहे.

भारत आणि फ्रान्समध्ये झालेला तांत्रिक देवाण-घेवाणीचा करार तर अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. इंजिन बनवणारी फ्रान्सची आघाडीची कंपनी ‘सॅफ्रन’ हिने भारतात हेलिकॉप्टर आणि लढाऊ विमाने यांची इंजिने संयुक्तरीत्या बनवण्यास मान्यता दिली आहे. अमेरिकेनेदेखील भारतात जेट इंजिन बनवण्यास सुरुवात करण्याचे आश्वासन दिले आहे; परंतु फ्रान्सने नवीन इंजिने विकसित करण्यासाठी संयुक्तरीत्या संशोधन आणि उत्पादन करण्याचे मान्य केले आहे. देश संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेने जाण्यात हा एक मोठा टप्पा ठरेल. भारतीय सेनेत स्थल, वायू आणि नौसेनेत वापरली जाणारी ‘चिता’ आणि ‘चेतक’ ही दोन्ही हेलिकॉप्टर्स भारतात गेल्या तीस वर्षांपासून कार्यरत आहेत. यांची संपूर्ण निर्मिती (इंजिनसह) भारतातच होत आहे. हे सर्व प्रकल्प बंगलोरच्या हिंदुस्थान एअरोनॉटिक्समध्ये कार्यरत आहेत. हेलिकॉप्टरच्या क्षेत्रात फ्रान्सच्या सहकार्यामुळेच आज भारताने ‘ध्रुव’ आणि ‘प्रचंड’ ही दोन प्रकारची हेलिकॉप्टर मोठ्या संख्येने निर्माण केली आहेत. पण गेल्या काही महिन्यांमध्ये या हेलिकॉप्टर्सना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला होता. फ्रान्सशी झालेल्या सहकार्याच्या करारामुळे या स्वदेशी बनावटीच्या हेलिकॉप्टर्समधील दोष दूर करून ती जागतिक तोडीची बनवण्यास मदत होईल. फ्रान्सच्या तांत्रिक सहकार्यामुळे हेलिकॉप्टरच्या क्षेत्रात आपण स्वयंपूर्ण बनलो आहोत तसेच नव्या करारामुळे लढाऊ विमानांच्या क्षेत्रातदेखील आपण निश्चितच स्वयंपूर्ण बनू शकतो.

१९९८ मध्ये भारताने अणुचाचण्या घेतल्या तेव्हा संपूर्ण पाश्चिमात्य जगाने आपल्यावर बहिष्कार टाकला होता. त्याला अपवाद फक्त फ्रान्सचा होता. अगदी डॉ. होमी भाभांच्या काळापासून भारताच्या अणुऊर्जा प्रकल्पात फ्रान्सने सहकार्य केलेले आहे. भारताने १९६०च्या दशकात प्रथम अवकाश संशोधनासाठी रॉकेट बनवण्यास सुरुवात केली तेव्हा पहिली काही रॉकेट्स आणि त्याचे तंत्रज्ञान आपल्याला फ्रान्सने देऊ केले होते. त्यातूनच आज इस्त्रोचा मोठा डोलारा उभा राहिला आहे. अवकाश संशोधनात आणि विमान तंत्रज्ञानात आज अमेरिकेच्या तोडीस तोड आहे, ही गोष्ट लक्षात ठेवायला हवी. भारताच्या अणुऊर्जा प्रकल्पामध्ये थोरियम वापरून मोठ्या प्रमाणावर वीज निर्माण करण्याचे प्रकल्प उभे करण्याचे स्वप्न आपण गेली अनेक वर्षे पाहत आहोत. जगात केरळमध्ये थोरियम खनिजाचा खूप मोठा साठा आपल्याकडे आहे. भारताव्यतिरिक्त फ्रान्समध्येही थोरियम मोठ्या प्रमाणात सापडते. त्यामुळे ऊर्जेचा हा स्त्रोत वापरण्यात दोन्ही देशांना रस आहे; परंतु गेली ३०-४० वर्षे प्रयत्न करूनही थोरियमचा अणुऊर्जेकरता वापर करण्यात आपण मागे राहिलो आहोत. दोन्ही देशांमध्ये झालेल्या वाटाघाटींमध्ये उघडपणे नव्हे; परंतु बंद दरवाजाआड याबद्दल नक्कीच वाटाघाटी झाल्या असणार, असा कयास आहे. फ्रान्सने महाराष्ट्रात जैतापूर येथे मोठा अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे कंत्राट मिळवले आहे; परंतु स्थानिक लोकांचा विरोध आणि राजकीय पक्षांचे तळ्यात मळ्यात धोरण असल्यामुळे हा प्रकल्प अद्याप मार्गी लागलेला नाही. भारताच्या भविष्यकाळातील ऊर्जेची गरज लक्षात घेता हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प मार्गी लागणे गरजेचे आहे.

फ्रान्समध्ये सध्या डाव्या आणि उजव्या पक्षांमध्ये भारताप्रमाणेच मोठ्या प्रमाणात दुही आहे. नुकतीच फ्रान्समध्ये एका मुस्लीम युवकाला पोलिसांनी मारल्यानंतर सर्व मोठ्या शहरांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला होता. सध्याचे फ्रान्सचे अध्यक्ष आधी डाव्या विचारांचे मानले जायचे; परंतु आता परिस्थितीनुसार त्यांनी आपले धोरण बदलले आहे. फ्रान्सच्या सर्वसामान्य जनतेत मुस्लीम कट्टरपंथीयांचा धोका हा प्रमुख मुद्दा आहे. त्यामुळे भारतातदेखील अशा प्रकारच्या घटना घडल्या होत्या तेव्हा सर्वसामान्य फ्रेंच नागरिकाच्या मनात भारताबद्दल सहानुभूती होती; परंतु मोदींची मुस्लीमविरोधी आणि अल्पसंख्याकविरोधी अशी प्रतिमा निर्माण केली गेल्यामुळे फ्रान्सच्या काही प्रसारमाध्यमांमध्ये एकूणच भारताच्या लोकशाहीपुढे प्रश्नचिन्ह निर्माण केले गेले होते. त्यातच भारतात निवडणुका हरलेल्या नेत्यांनी परदेशात जाऊन भारतात लोकशाही कशी धोक्यात आहे, याबद्दल गेल्या काही महिन्यांपासून गहजब माजवला आहे. त्यावरूनही फ्रान्सच्या टीव्ही माध्यमातून एकूणच भारत-फ्रान्स संबंधाबाबत एकतर्फी लिहिले गेले. काही पाश्चिमात्य माध्यमांमध्ये तर भारतातल्या अंतर्गत स्थितीची तुलना सोमालिया, चीन किंवा इराणसारख्या देशांशी केली जात आहे. हे सर्व सत्यापासून कितीही दूर असले तरी भारतातल्या न्यायपालिकेबद्दल किंवा निवडणूक प्रक्रियेबद्दल अविश्वास निर्माण केला गेला आहे. याचा परिणाम म्हणून भारत-फ्रान्समधील संबंध दृढ व्हायला हवेत वा त्यांना समर्थन मिळायला हवे, पण तसे होताना दिसत नाही.

भारताच्या दुर्दैवाने वैफल्यग्रस्त विरोधकांनी देशाची प्रतिमा परदेशात मलिन करण्यात बऱ्यापैकी यश मिळवले आहे. आपला देश परदेशात आपली बाजू मांडण्यात कुठे तरी कमी पडला आहे, असे दिसते. उदाहरणार्थ, निवडणुका हरल्यानंतर निवडणूक आयोग आणि मतदान यंत्रांना दोष द्यायचा पण जिंकल्यावर मात्र मूग गिळून बसायचे, अशी दुटप्पी भूमिका इथल्या विरोधी पक्षांनी घेतल्यामुळे भारताच्या हितशत्रूंचे फावते आहे. गेली २५ वर्षे भारत आणि फ्रान्सचे संबंध एक प्रकारे स्थिर राहिले आहेत आणि त्यात भारत-अमेरिका संबंधासारखा चढ-उतार दिसत नाही. याचे श्रेय दोन्ही देशांच्या परराष्ट्र खात्यांकडे जाते. कारण त्यांनी अंतर्गत राजकारणापासून भारत-फ्रान्स संबंध दूर ठेवण्याची किमया करून दाखवली आहे.

**- ज्येष्ठ अभ्यासक, कर्नल (नि.) अनिल आठल्ये**


आडवे शब्द

१. धूर्त, लबाड ४. भेग, चीर ७. शंकराचे एक नाव १०. शहर ११. सोसाट्याचा वारा १२. कलावंत १३. आशीर्वाद देणारा १५. शाब्दिक चकमक १७. ओटा, कट्टा १८. अज २०. काटेरी आंबटगोड फळ २१. वटवट, त्रास २३. अंतरिक्ष २४. शंभर पैशांचे नाणे २६. घेतलेले रूप, मुखवटा २७. द्रव्य, पैसा २८. चांदण्याचा ऋतू ३०. हावरटपणा ३२. भीती ३३. कुबेराचा सेवक ३४. स्तुती करणारा ३६. विशेष ३८. पुष्परस ३९. मोठा शिस्तीचा ४१. घामाघूम होणे ४३. नजरफेक ४५. यात्रेस जाणे ४६. सोन्याचा धागा ४७. रेशमी धोतर ४८. महिरप ५०. कमनीय ५२. बारीकसारीक माहितीसह ५४. मनाचा ओढा ५५. पाने कुरतडणारी ५६. मोठी उथळ वाटी ५८. साखरेची फुगीर वडी ५९. दुर्दशा ६२. मदत ६३. अधिकार, अम्मल ६४. सिद्धता ६५. पांढरपेशा ६७. पांढराशुभ्र प्राणी ६८. क्षमाशील ७०. थोडे, मित ७१. नवरा ७२. शपथ ७३. वात्रट ७६. उद्धट, गर्विष्ठ ७७. परवशता

उभे शब्द

१. कर्णेंदिय २. गतिमान ३. पोते ४. हाक ५. सुटकेचा मार्ग ६. कर्नाटकातील सोन्याच्या खाणीचे गाव ७. देशी शीतपेय ८. शिव्यांनी युक्त ९. नवरदेव ११. खटला दाखल करणारा १२. अलमारी, दरवाजा १४. रावण १६. गाईचे पिल्लू १९. युक्ती २०. पुष्कळ २१. अंदाज, तर्क २२. शिखराचे टोक २३. सदऱ्याचा लांबलचक प्रकार २५. बदल २६. हत्तीचे नाक २७. जलप्रपात २९. संरक्षण करणारा ३१. मध्यस्थ ३४. ज्वारीची चपाती ३५. पोट ३७. कायदेशीर ३८. अंत:करण ४०. डोंगराची उतरण ४१. नृत्यकला अवगत असलेला ४२. नामघोष ४४. हिंमत ४७. चषक ४९. दाणे कुटण्याचे बिनविजेचे साधन ५०. पुरुषांच्या कानावरील अलंकार ५१. गच्चू, दाटीवाटीने ५२. संरक्षक भिंत ५३. बातमीदार ५५. सामान्य प्रतीचा ५६. दक्ष राजाची कन्या ५७. ठरविलेला बेत ५९. परीक्षा घेणारा ६०. पाट्याचा जोडीदार ६१. दोरा ६२. नेहमी ६३. टोळीचा प्रमुख ६६. राख ६७. अभिवादन (हिंदी) ६९. पोत्याचे कापड ७०. कृष्णकथेतील वृक्ष ७२. वजन ७४. गाडीचे छत ७५. किंमत

## शब्दकोडे-१२७



## शब्दकोडे १२६ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.रतिमदन ५.पराभव ८.कोळसा ११.नरम ११अ.रम १२.नवरा १४.रक्षक १५.हाट १६.सर १७.टकमक १९.वखार २१.दासबोध २४.रग २५.गत २७.पर २८.कारा २९.करवत ३१.सन ३२.सुपारी ३४.गोरी ३५.रकाना ३७.खानसामा ३९.क्षमायाचक ४२.दालन ४३.खरी ४४.कळस ४५.नगर ४७.जनकजननी ५१.झोपडी ५२.रीम ५३.चवड ५४.बाई ५५.कलप ५७.लता ५९.सागर ६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल ६७.नारी ६८.टक ६९.अजा ७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात ७६.डाका ७८.खतरनाक ८०.मानव ८२.रवि ८४.टपकन ८५.रज ८६.पदरमोड

**उभे उत्तर**

१.१.रत्नहार २.मन ३.दर ४.नमस्कार ५.परसदार ६.रामरस ७.वन ८.कोरा करकरीत ९.सारक १०.चाकवत १३.वट १८.मगर २०.खानेसुमारी २२.बोका २३.धरा २५.गतकाल २६.मनन २७.परीक्षक ३०.वरदायिनी ३१.सखा ३३.प्रयास ३६.नानकटाई ३८.साखरझोप ४०.माळकरी ४१.कफन ४५.नरक ४६.वडीलधारी ४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी ५४.बाईलवेडा ५६.लखलखीत ५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी ६२.तास ६४.तीरकमान ६६.खसखस ६७.नायनाट ६९. अभाविप ७०.जात ७३.मन ७५.तर ७७.कापड ७९.कप ८१.वर ८३.घार

## पंढरपूरचा ‘विठ्ठल’ हसतोय!

गेल्या काही महिन्यांमध्ये राजकारणाने केव्हा काय घडेल हे कोणालाच समजेनासे झाले आहे. राजकारणातील जे धुरीण आडाखे बांधून मतमतांतरे व्यक्त केली जायची त्यांच्याकडून त्यांचे सारे अंदाज आणि आडाखे बांधणच अवघड झालं आहे. अर्थात बेरजेच्या राजकारणात हे असं घडतच असतं. खरंतर यात नवीन काही नाही. पूर्वी कधीतरी घडणाऱ्या घटना होत्या. आता या अलीकडे वारंवार घडत आहेत. राजकारणाचा पोतच बदलला आहे, असच म्हटलं जातय. महाराष्ट्राच्या राजकारणात राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि अन्य सहकारी मंत्री आणि आमदारांनी सरकारमध्ये सहभागी होण्याची जी भूमिका घेतली त्यामुळे साहजिकच महाराष्ट्राचं राजकारण ढवळून निघणं साहजिकच होतं.

कारण भाजप-शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली वर्षभरापूर्वी स्थापित झालेले सत्तास्थानी असताना उपमुख्यमंत्री अजितदादांनी राजकारणात एक नवा ‘ट्विस्ट’ आणला. दुपारी एक वाजता अजितदादा पवार आणि सहकारी मंत्र्यांनी शपथ घेतल्यावर कोणालाच काय घडतंय, हे कळलं नाही. इतरवेळी दिवसभर बातम्यांचे रतिब लावणारे पत्रकारही या बातमीने अवाक झाले. समाजामध्येही माध्यमांची विश्वसनिय ‘सूत्र’ गेली कुठे? असा प्रश्नच सर्वांना पडला तर त्याचही नवल कुणाला वाटण्याचं कारण नाही. महाराष्ट्रात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्याच भाषेत सांगायचं तर ट्रिपल इंजिन सरकार आल्या दिवसापासून अनेक शंका-कुशंका आणि या राजकीय घडामोडींविषयीची चर्चा सतत होत राहिली आहे. या राजकीय घडामोडींमध्ये राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची नेमकी भूमिका काय आहे, ही संभ्रमावस्था अगदी आजही कायम आहे. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार हे संभ्रमावस्था निर्माण करण्यात मातब्बर नेते म्हणून ओळखले जातात. या संपूर्ण राजकारणातही पवार यांचा पावसाच्या पाण्याने भिजलेला फोटो व्हायरल झाल्यावरही लोकांच्या शंकाचे समाधान झाले असे नाही. अगदी पंधरा दिवसांनंतरही शरद पवार काहीही करू शकतात, अशीच चर्चा होत होती. मात्र आता उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या सोबतच्या ज्येष्ठ मंत्र्यांनी जी भूमिका घेतली त्यासंबंधी शरद पवार यांच्या आशीर्वादाशिवाय असे काही घडूच शकत नाही, असेच सर्वांना वाटते. त्यातही राष्ट्रवादीचे शरद पवार यांचे निकटवर्तीय प्रफुल्ल पटेल यांचाही या सर्वांमध्ये असलेला पुढाकार आणि पुन्हा माध्यमांसमोर त्यांचं बोलणं याचा विचार केल्यावर यामागे ‘अदृश्य’ हात कुणाचा असू शकतो हे सांगण्यासाठी कुणा ज्योतिषाचीही आवश्यकता वाटत नाही. **-संतोष वायंगणकर**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**‘लक्ष महाराष्ट्र’ नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# मणिपूर महिला अत्याचारातील दोषींवर कारवाईचे अंनिसचे राष्ट्रपतींना मागणीचे निवेदन

नाशिक । प्रतिनिधी



गेल्या अडीच महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून मणिपूर राज्यात जातीय व धार्मिक जाळपोळ, हिंसा घडत आहेत. ते शांत करण्यासाठी व थांबवण्यासाठी केंद्र सरकार तसेच मणिपूरचे राज्य सरकार यांनी कोणतीही ठोस कृती केल्याचे दिसून आलेले नाही. असा आरोप अंनिसने राष्ट्रपतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या निवेदनात केला आहे.दरम्यान या प्रकरणी संबंधितांवर कडक कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हिंसक जमावाने तीन महिलांना पोलिसांच्या ताब्यातून खेचून रस्त्यावर आणले. त्यांना विवस्त्र होण्यास भाग पाडले. त्यांची नग्न धिंड काढली. त्यांच्यावर सामूहिक बलात्कार केले. प्रतिकार करण्यासाठी गेलेल्या त्यांचे वडील व भाऊ यांना जागेवरच ठार केले. अशा दृश्याची व्हिडिओ क्लिप नुकतीच मिडियात व्हायरल झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही हे प्रकरण गांभीर्याने घेऊन, केंद्र सरकारला फटकारले आहे. खरंतर ही घटना मागील मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घडली असल्याचे समजते. दरम्यानच्या काळात मणिपूरमध्ये अशा अनेक घटना घडल्याची शक्यताही महाराष्ट्र अंनिसने निवेदनात व्यक्त केलेली आहे.

महिलांवरील या वाढत्या अत्याचारांना कायमचा पायबंद घालायचा असेल तर मणिपूर मधील महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना तातडीने पकडून, त्यांचा कोणताही जात, धर्म, राजनैतिक निष्ठा असा भेदभाव न करता कडक कायदेशीर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र अंनिसच्या वतीने राष्ट्रपती यांना पाठविण्यासाठी जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले. त्याची एक प्रत पंतप्रधान यांना अग्रेषित करण्यात आलेली आहे.

या निवेदनावर अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, राज्य कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव, राज्य सदस्य राजेंद्र फेगडे, प्रल्हाद मिस्त्री, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. श्यामसुंदर झळके, नाशिक शहर कार्याध्यक्ष कोमल वर्दे, नाशिकरोड शाखेचे कार्याध्यक्ष अरुण घोडेराव, उपाध्यक्ष विजय खंडेराव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा आज वाढदिवस 'सेवा दिन' म्हणून साजरा करणार

**भाजपा नाशिक महानगराध्यक्ष प्रशांत जाधव यांची माहिती**

नाशिक । प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील दुर्घटनेमुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आज २२ रोजी कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम आयोजित न करता हा दिवस 'सेवा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय प्रदेश भारतीय जनता पार्टीने घेतला आहे. भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असल्याची माहिती नाशिकचे भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी दिली

बावनकुळे यांनी घेतलेल्या निर्णयानुसार सेवा दिनाच्या माध्यमातून पक्षाचे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी राज्यभर पूरग्रस्त नागरिकांना सहाय्य करतील, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे नाशिक महानगर अध्यक्ष कार्यालयातून एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रशांत जाधव यांनी दिली.यानिमित्ताने विविध कार्यक्रमांची आखणी केली असून, सेवा दिनी रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, मधुमेहासाठी रक्त तपासणी शिबिर, वृद्धाश्रमात असलेल्या ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबिर कानाची तपासणी तसेच व्हीलचेयर नेत्रदान शिबीर कृत्रिम अवयवांचे वाटप, पूरग्रस्त कुटुंबांना अन्न वाटप असे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. पूरग्रस्तस्थिती असेपर्यंत आरोग्यसेवेचा व अन्य उपक्रम चालू राहणार आहे.

---

ॲड. ज्योत्सना पाटील, धुळे
निशाणी नं.६

## जाहीर नोटीस / समन्स

**धुळे येथील मे. चिफ ज्युडि. मॅजि. सो. धुळे यांचे कोर्टात**

फौ. कि. अर्ज नं. ५८६/२०२३

पुनम विठोबा गवळी .....अर्जदार
विरूध्द
मा. ग्रामसेवक सो. .....सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार हिने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग-१ सो. कोर्ट नं. धुळे या न्यायालयात फौ. कि.अर्ज. नं. ५८६/२०२३ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.२८/८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी ग्रुप ग्रामपंचायत कुळथे ता. जि. धुळे तसेच तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद, हरकत, तक्रार, म्हणणे असल्यास धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग-१ सो. कोर्ट नं. ९ धुळे या न्यायालयात वरील नेमलेल्या तारखेस स्वतः अगर अथवा वकिलामार्फत उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामी पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १३/७/२०२३

कामगिरी कारकून, सह न्यायदंडाधिकारी सो. धुळे (शिक्का) सहाय्यक अधिक्षक, सह न्यायदंडाधिकारी सो. धुळे

---

ॲड. एम. व्ही. घरटे, धुळे
निशाणी नं.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधिश सो., (क स्तर.) यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ८८७/२०२३

श्री. महेंद्र काशिनाथ पाटील
उ.व.-५०, धंदा शेती व व्यापार,
रा. नकाणे, ता. जि. धुळे. ....... अर्जदार
विरुध्द
१. कै. चंद्रभागाबाई जगन्नाथ पाटील
मयताचा पत्ता: नकाणे उपनगर,ता.जि.धुळे.
मृत्यु दिनांक : ०२.०४.२०२२
२. कै. जगन्नाथ राजाराम पाटील
मयताचा पत्ता नकाणे उपनगर,ता.जि.धुळे.
मृत्यु दिनांक : २१.०९.२०२२ .......सा:वाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

१. अर्जदार यांनी ते मयत कै. चंद्रभागाबाई जगन्नाथ पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक २८.०८.२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि.२०.०७.२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : २०.०७.२०२३ आदेशावरून

कामगिरी कारकून, दिवाणी न्यायालय (व. स्तर), धुळे (शिक्का) सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व. स्तर), धुळे

---

ॲड. पंकज व्ही. वाघ, धुळे
निशाणी नं.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ८५३/२०२३

१. प्यारन बुरान खाटीक, वयः - ७८ कामधंदा :- काही नाही. २.मिरन बुरान खाटीक, वय - ६८ कामधंदा :- मजुरी. ३. मासुम बुरान खाटीक, वय :- ६० कामधंदा :- मजुरी, ४. सानुबाई दगडु खाटीक, वय :- ७७ कामधंदा- घरकाम ५. बानुबाई शब्बीर खाटीक, वय :- ७१ कामधंदा :- घरकाम
नं. १ ते ५ सर्व रा. सावळदे, ता. जि. धुळे.
६. बाबुबाई फकीरा खाटीक, वय :- ७० कामधंदा :- घरकाम. ७. सालमा गफ्फुर खाटीक, वय :- ७३, कामधंदा :- घरकाम
नं. ६ व ७ रा. रजाळे, ता. जि. नंदुरबार...... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही .... सामनेवाला
आणि
१. मुलामबाई बुरान खाटीक (मयत) मयत दि. ०१/१२/२००१, २. बुरान कासम खाटीक (मयत) मयत दि. ११/०७/१९७८, दोघांचे मृत्यु ठिकाणः सावळदे, ता. जि. धुळे **.....मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात मुलामबाई बुरान खाटीक (मयत) यांचे अर्जदार नं १ ते ७ हे कायदेशीर वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय तसेच महसुल दप्तरी तसेच खाजगी कामाकरीता आवश्यक असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. १३/७/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.१९/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. ६ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण- धुळे
दिनांक - २०/७/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकून, दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे (शिक्का) अधिक्षक, दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे

---

प्रोसेस जमा ॲड.अनिल एन. वळवी, साक्री
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज क्र. १९४/२०२३

कै. एलजी कौतीक निकम - मयत यांचे वारस
गं.भा.सुशिलाबाई एलजी निकम (सुतार) व इतर,
उ. व. - ७१, धंदा - मजुरी,
राहणार-चिंचवार, ता. जि.धुळे **.....अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही ....सामनेवाला**
मयत - कै. कौतिक हेमचंद निकम (मृत्यू दिनांक-२२/११/१९७०)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ०४/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. गं. भा. सुशिलाबाई एलजी उर्फ येलजी निकम ( सुतार), २. श्री. अशोक एलजी निकम (सुतार), ३. श्री. नानाभाउ एलजी निकम (सुतार), ४. श्री. आण्णा एलजी निकम ( सुतार), ५. सौ. कमलबाई गोकुळ जगताप, ६. गं. भा. इंदुबाई भाईदास निकम (सुतार), ७. श्री. प्रकाश भाईदास निकम ( सुतार), ८. सौ. अनिता बंडू वाघ, ९. सौ. सखुबाई एकनाथ मोरे, १०. कु. संदिप रविंद्र बोरसे, ११. कु. पुनम शिरीष उर्फ रविंद्र बोरसे, १२. श्री. समाधान रामदास निकम (सुतार), १३. श्री. दिनेश रामदास निकम (सुतार), १४. श्री. मृणाल संतोष शार्दुल, १५. श्री. प्रतिक संतोष शार्दुल, १६. सौ. कल्पनाबाई राजेंद्र खैरनार, १७. सौ. सुमनबाई दत्तात्रय शार्दुल.

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी, विविधप्रकारच्या शासकिय व निमशासकीय कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साकी कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १९/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ- साक्री,
दिनांक-२०/०७/२०२३ आदेशावरुन,

क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री (शिक्का) सहायक अधिक्षक, सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री

---

ॲड. गणेश मगन पवार, धुळे
निशाणी नं.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज नं. ८७७/२०२३

१) कल्पना लालदास शिंदे
उ. वय.:- ५४ वर्ष, धंदा :- घरकाम,
रा. वडजाई, ता. जि. धुळे.
२) सपना संजय वाघ (माहेरचे नाव)
उ. वय.:- २३ वर्ष, धंदा :- घरकाम
रा. ६८५, थर्मल पावर रोड, भंगारवाडाजवळ,
लोणीपाडा, डहाणु रोड, ठाणे. ......**अर्जदार**
वि.
कोणीही नाही ...... **सामनेवाला**
रविंद्र लालदास शिंदे (मयत)
मृत्यु दि. २७/०५/२०२२
मृत्यु समयी पत्ता : हिरे मेडिकल कॉलेज, धुळे .....**मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. १५/७/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ८७७/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार नं. १ व २ हे रविंद्र लालदास शिंदे (मयत) यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस दाखला हा शासकीय-निमशासकीय व इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने सदरहु वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २४/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर कोर्ट नं.२, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २०/७/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकून, मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं. (शिक्का) सहाय्यक अधिक्षक, मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.

---

प्रोसेस जमा ॲड.अक्षय ए. सगर, साक्री
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज क्र. २१८/२०२३

श्रीमती. मंगलबाई प्रविण जैन व इतर-१, उ.व.-४५,धंदा-घरकाम, राहणार-इंदवे, ता. साक्री, जि.धुळे **.....अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही ....सामनेवाला**
मयत - कै. प्रविण बिरदीचंद जैन - (मृत्यू दिनांक-३०/१०/२०२१)
मयत -कै. ताराबाई बिरदीचंद जैन - (मृत्यू दिनांक-२०/०८/२०२०)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक १४/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. मंगलबाई प्रविण जैन,
२. कु. प्रेक्षा प्रविण जैन,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी, विविधप्रकारच्या शासकिय व निमशासकीय कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०२/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-२०/०७/२०२३ आदेशावरुन,

क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री (शिक्का) सहायक अधिक्षक, सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री

---

ॲड दिपक जी बोरसे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

दि.कि.अ.नं. २३४/२०२३

१) गं. भा. खटा गबा पगारे उ.व.-७०, धंदा-काहीनाही
२) श्री. पावबा गबा पगारे उ.व.-३७, धंदा-शेती
क्र.१ व २ रा. जैताणे ता. साक्री जि. धुळे
३) सौ. आषाबाई छोटू पाकळे उ.व.-३५, धंदा-घरकाम
क्र. ३ रा. ऐचाळे ता. साक्री जि. धुळे **.....अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही ....जाबदेणार**

ज्या अर्थी अर्जदार यांनी साक्री येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सो. साक्री यांचे कोर्टात दि.२१/०७/२०२३ रोजी दिवाणी कि. अर्ज २३४/२०२३ चा दाखल केलेला आहे. सदर अर्जदार यांनी मयत गबा बळीराम पगारे यांचे कायदेशीर वारस असले बाबतचा वारस दाखला मिळण्याकरीता मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशी कामकाज चालविणेकरता पुढील चौ. ता. २५/०८/२०२३ ही निश्चित केली आहे, त्याअर्थी तमाम जनतेस, हितसंबंधीत, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, मयत गबा बळीराम पगारे यांचेशी कोणाचाही काहीही हितसंबंध, किंवा मयताचा वारस असले बाबत काही वाद असल्यास साक्री येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर, न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. सदर नोटीस मे. कोर्टाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :-२१/०७/२०२३

कामगिरी क्लार्क, दिवाणी न्यायालय क. स्तर, साक्री (शिक्का) प्रभारी सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर, साक्री

---

ॲड दिपक जी बोरसे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

दि.कि.अ.नं. २३५/२०२३

१) गुलाब सोमनाथ मोरे उ.व.-६० धंदा-निवृत्त
रा.प्लॉट नं. ५१ बी. देवचंद नगर, नंदुरबार ता.जि.नंदुरबार
२) कैलास सोमनाथ मोरे उ.व.-४७, धंदा-नोकरी
रा. सर्व्हे नं. ३६३/१ ए आणि ३६३/१बी प्लॉट नं. ११, बापुजी नगर, नंदुरबार ता. जि. नंदुरबार
३) वंदना भाऊसाहेब आजगे उ.व.-४३, धंदा-घरकाम
रा.वसमार ता.साक्री जि.धुळे **.....अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही ....जाबदेणार**

ज्या अर्थी अर्जदार यांनी साक्री येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सो. साक्री यांचे कोर्टात दि.२१/०७/२०२३ रोजी दिवाणी कि. अर्ज २३५/२०२३ चा दाखल केलेला आहे. सदर अर्जदार यांनी मयत ठगूबाई सोमनाथ मोरे यांचे कायदेशीर वारस असले बाबतचा वारस दाखला मिळण्याकरीता मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशी कामकाज चालविणेकरता पुढील चौ. ता. ०५/०९/२०२३ ही निश्चित केली आहे, त्याअर्थी तमाम जनतेस, हितसंबंधीत, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, मयत ठगूबाई सोमनाथ मोरे यांचेशी कोणाचाही काहीही हितसंबंध, किंवा मयताचा वारस असले बाबत काही वाद असल्यास साक्री येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर, न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. सदर नोटीस मे. कोर्टाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- २१/०७/२०२३

कामगिरी क्लार्क, दिवाणी न्यायालय क. स्तर, साक्री (शिक्का) प्रभारी सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर, साक्री

---

निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्टात**

फौ.कि.अर्ज.नं. ८२९/२०२३

जंगलु दिलीप माळीच, उ. व. २१ धंदा मजुरी.
रा.दातर्ती ता.साक्री जिल्हा धुळे **.....अर्जदार**
**विरुध्द**
म.ग्रामसेवक, निबंधक, जन्म-मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय,
रा.दातर्ती ता.साक्री जिल्हा धुळे **...सामनेवाला**
जंगलु दिलीप माळीच -(जन्म दि ०८/०५/२००२)

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. याचे कोटांत दि. २०/०६/२०२३ रोजी फौजदारी कि. अर्ज नं. ८२९/ २०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील ९ (३) प्रमाणे जन्माची नोंद करणेबाबत वरील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता पुढील चौकशी तारीख २१/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की. याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. न्यायदडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्ट नं. २ या न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून तक्रार करावी. त्याअर्थी मे न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोटांचे सही शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री,
दि. २१/०७/२०२३

क. लिपीक (दिवाणी व फौजदारी न्यायालय क स्तर साक्री , जि.धुळे ) (शिक्का) सहा अधिक्षक (दिवाणी व फौजदारी न्यायालय क स्तर साक्री , जि.धुळे )

## न्यूज कॉलम

### विवाहितेचा छळ; पाच जणांवर गुन्हा

**धुळे ।** शहरातील चितौड रोडवरील विवाहितेचा घर बांधण्यासाठी माहेरून पैसे आणावे, यासाठी छळ झाला. याबाबत ३० वर्षीय विवाहितेच्या तक्रारीवरून पती सागर जयसिंग बोरसे, जयसिंग व्यंकट बोरसे, निर्मला जयसिंग बोरसे, तुषार जयसिंग बोरसे, शीतल हर्षल बागूल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

### अल्पवयीन बेपत्ता; अपहरणाचा गुन्हा

**धुळे ।** धमाणे (ता. धुळे) फाटा येथे मध्य प्रदेशातून मजुरीसाठी आलेल्या कुटुंबातील १६ वर्षीय मुलगी बेपत्ता झाली. शोध घेऊनही ती कुठे आढळली नाही. तिचे आमिष दाखवून अपहरण केले, अशी तक्रार पीडित मुलीच्या वडिलांनी दिली.

### रिक्षा लांबवली; एकाविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** धमाणे शहराजवळील सावळदे (ता. धुळे) फाटा येथील गॅरेजमधून जुनी रिक्षा, लोखंडी पाइप, रोप वायर, जॅक व इतर साहित्य लांबविण्यात आले. तौसिफ शाह सलीम शाह (रा. रामदेव बाबानगर, ८० फुटी रोड) व त्याचा सहकारी यांनी ही चोरी केल्याचा संशय बाळू झेंडू कुवर यांनी व्यक्त केला. त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला.

# ‘सीएससी’ मार्फत होणाऱ्या भरती प्रक्रियेला स्थगिती द्या!

## उमेदच्या महिला संघटनेचे जि. प. अध्यक्ष अश्विनी पाटील यांना निवेदन

**धुळे । प्रतिनिधी**



सीएससी मार्फत चालू असलेल्या भरती प्रक्रियेला स्थगिती द्यावी यासह विविध प्रलंबित मागण्या सोडवाव्यात अशा आशयाचे निवेदन उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने बुधवारी धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजि. सौ. अश्विनीताई पाटील यांना भेटून दिले.संघटनेच्या मागण्या सोडविण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन अध्यक्ष सौ. पाटील यांनी शिष्टमंडळाला दिले.

उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेच्या धुळे जिल्हा शाखेच्या वतीने बुधवारी सकाळी धुळे जिल्हा परिषद अध्यक्ष इंजि. अश्विनी पाटील यांची भेट घेतली, आणि त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्रा. अरविंद जाधव,उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटना जिल्हा धुळे अध्यक्ष ईश्वर पाटील,उपाध्यक्ष राकेश देवरे, उमेद महिला कल्याणकारी संघटना तालुका अध्यक्ष

रुपाली पाटील, उपाध्यक्ष ज्योती शिंदे, सचिव श्रीमती शीतल पाटील, तालुका कर्मचारी तथा संघटना सदस्य अतुल सूर्यवंशी, कुणाल दुसाने, विजया अहिरे, वर्षाराणी हिरे, मीना देवरे व गावातील महिला उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे की, सीएससी मार्फत चालू असलेली भरती प्रक्रियेला तात्काळ स्थगिती द्यावी. कारण त्यामुळे कार्यरत संघटनेच्या सदस्यांची मानधन वाढ, आयजेपि, बदली होणार नाही. उमेद अभियानामध्ये कार्यरत सर्व समुदाय संसाधन व्यक्तींना केडर रोजगार हमी कायद्याप्रमाणे एक दिवसाचा रोजगार याप्रमाणे ३० दिवसाचे मासिक निश्चित मानधन देण्यात यावे, प्रत्येक महिन्यात दहा तारखेपर्यंत नियमित वितरण करावे. केडर नियुक्ती वरील बंदी उठवून शंभर टक्के गावात केडर निवड करावी. अभियानातील सर्व स्टाफला ५०% मानधन वाढ व ग्रामविकास विभाग अंतर्गत स्वतंत्र केडर निर्माण करून शासकीय सेवेत ५८ वर्षापर्यंत कायम करण्यात यावे. एमएसआरएलएमच्या मनुष्यबळ संसाधन मार्गदर्शक सूचनेनुसार रिक्त तसेच नवीन पदांसाठी पूर्ववत आयजेपी प्रक्रिया करून तदनंतरच नवीन पदांसाठी भरती करावी. तसेच सीएससी/त्रयस्थ कंपनी रद्द करून कार्यरत सीएससी कर्मचाऱ्यांचे अभियानात समायोजन करावे. उमेद अभियानांतर्गत कार्यरत प्रभाग समन्वयक, सहाय्यक कर्मचारी, इतर कर्मचारी यांच्या विनंतीनुसार जिल्हाअंतर्गत, जिल्हा बाहेर बदली करण्यात यावी. कोविड १९ च्या कालावधीत करार नूतनीकरण करताना देण्यात येणारी इन्क्रिमेंट ज्या कर्मचाऱ्यांना मिळालेली नाही, त्यांना ती पूर्ववत देण्यात यावी. जेणेकरून काही कर्मचारी यांना इन्क्रिमेंट न मिळाल्यामुळे मानधनात तफावत दिसते, ती कमी होईल व सर्वांना समान न्याय मिळेल. उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेला शासन मान्यता संघटना म्हणून मान्यता मिळावी, अशा मागण्या करण्यात आलेल्या आहे. या मागण्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य, पाठपुरावा करण्याचे आश्वासन अध्यक्षापाटील यांनी शिष्टमंडळाला दिले.

# अशोकनगर पाण्याच्या टाकीची दुरावस्था





**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील लेनीन चौक नजीकच्या अशोक नगर येथील जलकुंभाच्या दुरावस्थेप्रकरणी महापौर प्रतिभा चौधरी यांनी पाहणी करत तात्काळ दुरुस्तीचे आदेश दिले आहे. महापौर सौ.प्रतिभा शिवाजीराव चौधरी यांनी जलकुंभास भेट देऊन पाहणी केली. सदर जलकुंभाच्या जिन्याची दुरुस्ती तसेच कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती, नवीन छत तयार करणे, परिसराची साफसफाई याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकार्यांना महापौरांनी

घटनास्थळी दिले. सदरचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करुन अहवाल सादर करण्याचेही महापौरांनी आदेशीत केले आहे.

जलकुंभ पाहणी प्रसंगी महापौर चौधरी यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त विजय सनेर, नगरसेवक अमोल मासुळे, सहा.अभियंता चंद्रकांत ओगले उपस्थित होते. अनेक दिवसांपासून शहरातील नागरिकांना अस्वच्छ पाणीपुरवठा होत आहे. त्यातच नगरपालिकेमार्फत आपल्या घरी येणारे पाणी ज्या टाक्यांतून येते त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील लेनीन चौक नजीकच्या अशोक नगर येथील पाण्याच्या टाकीची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे धोका निर्माण झाला आहे. सदर टाकी स्वच्छ झाली नसल्याने टाकीत शेवाळ व अन्य घाण मोठ्या प्रमाणावर साचली आहे. यामुळे यातील पाण्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. या गंभीर विषयाकडे नगरपालिका प्रशासनाचे साफ दुर्लक्ष होत आहे. जबाबदार अधिकारी व नगरसेवकांचे या गंभीर बाबीबाबत अनेक वेळा लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी याची योग्य दखल घेतली नाही. तरी लवकरात लवकर पाण्याच्या टाकीची स्वच्छता व्हावी अशी, मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

# नोकरीचे आमिष दाखवून वृद्धाला २१ लाखांचा गंडा

**धुळे ।** शहरातील एकाच कुटुंबातील तिघांना आरोग्य सेवा संचालनालयात नोकरी लावून देतो, असे आमिष दाखवून २० लाख ७५ हजारांत गंडवण्यात आले. निवृत्त कर्मचारी दिनकर मार्तंड तांबे यांच्या फिर्यादीनुसार चंद्रभान जवरीलाल ओसवाल हे ओळखीचे आहेत. त्यांचा एकमेकांशी संपर्क आहे. मुलाला नोकरी नाही, शासकीय नोकरी मिळाली तर बरे होईल, असे त्यांच्यात कायम संवाद होत असे. याचा चंद्रभान ओसवाल यांनी गैरफायदा घेतला. श्री. तांबे यांना विश्वासात घेऊन मुलगा, मुलगी आणि सून अशा तिघांना आरोग्यसेवा संचालनालयात शासकीय नोकरी लावून देतो, असे आमिष दाखविले. त्याबदल्यात ओसवाल याने २० लाख ७५ हजार घेतले. पैसे दिले मात्र नोकरी लावून दिली नाही. खोटे पत्र व ऑर्डर दाखवत फसवणूक केली.

# ‘कांदा अनुदानप्रश्नी आमदारांना फोन करा’

### कांदा उत्पादक संघटनेचे अभिनव आंदोलन

**नाशिक । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे झालेली नुकसान भरपाई अनुदान आणि चार महिन्यांपूर्वी जाहीर झालेले कांदा अनुदान अजूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग झालेले नाही. आता राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपापल्या तालुक्यातील आमदारांना फोन करावेत. असे आवाहन महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केले आहे.

दिघोळे यांनी प्रसिद्धी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तत्काळ सरसकट सर्व अर्ज जमा केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर कांदा अनुदान व अतिवृष्टीचे पंचनामे झालेल्या सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम जमा करण्याची मागणी संबंधित आमदारांनी विधीमंडळ अधिवेशनात करावी. अशी मागणी शेतकऱ्यांनी फोनवर करावी.

जोपर्यंत याबाबत अधिवेशनात ठोस भूमिका घेतली जात नाही तोपर्यंत प्रत्येक तालुक्यातील शेतकऱ्यांचे आमदारांना इतक्या संख्येने फोन गेले पाहिजेत की, आमदारांचे वैयक्तिक मोबाईल नंबर व त्यांच्या पीएंचे मोबाईल नंबर दर मिनिटाला खणखणले पाहिजेत असेही भारत दिघोळे यांनी म्हटले आहे.

# नाशिक लोकसभा मतदार संघात ३० कोटींच्या रस्त्यांच्या कामांना पुरवणी अर्थसंकल्पात मान्यता : खा. हेमंत गोडसे यांची माहिती

नाशिक । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या आदिवासी भागातील रस्त्यांचे मजबुतीकरण व कॉंक्रिटीकरण व्हावे यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडून सुरू असलेल्या सततच्या प्रयत्नांना यश आले आहे. यासाठी सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांमधील तीस कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या आदिवासी तालुक्यासह नाशिक तसेच सिन्नर तालुक्याच्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामांना लवकरच प्रारंभ होणार असल्याची माहिती खा. हेमंत गोडसे यांनी दिले आहे.



नाशिक लोकसभा मतदारसंघातील इगतपुरी, त्रंबकेश्वर ,सिन्नर, नाशिक या तालुक्यांमधील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. गावांमधील रस्त्यांचे डांबरीकरण तसेच कॉंक्रीटीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी ग्रामीण भागातील रहिवासी तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून रस्ता दुरुस्तीसाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडे सततची मागणी होत होती. नागरिकांकडून आलेल्या मागणीची दखल घेत गेल्या काही महिन्यांपासून खा.गोडसे यांनी रस्त्यांच्या डांबरीकरण आणि कॉंक्रीटीकरण करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. खा. गोडसे यांच्या सततच्या प्रयत्नांना यश आले असून कालच्या पुरवणी मागणी अंतर्गत ३० कोटी रुपयें खर्चाच्या रस्त्यांच्या कामाला मान्यता देण्यात आली आहे. यापैकी २० कोटी रुपयांची कामे आदिवासी विभागाकडून तर उर्वारित १० कोटी रुपयांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत देण्यात येणार आहेत.

# कुंभार समाजाच्या जिल्हा युवा सरचिटणीसपदी अनिल कुंभार

### धुळे येथे आयोजित समाज मेळाव्यात होणार नियुक्ती

**होळनांथे । प्रतिनिधी**



धुळे जिल्हा कुंभार समाजाच्या युवा सरचिटणीसपदी होळनांथे (ता.शिरपूर) येथील अनिल गोरख कुंभार यांची निवड झाली असून दिनांक ३० जुलै रोजी आयोजित समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभात श्री. अनिल कुंभार यांना माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात येणार असल्याचे पत्र श्री. अनिल कुंभार यांना संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे.

धुळे जिल्हा कुंभार समाजाचा मेळावा तथा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ दिनांक ३० जुलै रोजी धुळे येथे संपन्न होत आहे. माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांच्या अध्यक्षतेखाली तर धुळे जिल्हा कुंभार समाजाचे अध्यक्ष सुरेश बहाळकर, उपाध्यक्ष रतीलाल कुंभार, कार्याध्यक्ष सुभाष कुंभार, युवा अध्यक्ष किशोर कुंभार, शिरपूर तालुका अध्यक्ष गोकुळ कुंभार, विट उद्योजक प्रवीण धाडे, मूर्तिकार आघाडीचे राजेंद्र चित्ते, पारंपारिक कुंभार व्यवसाय आघाडीचे नाना परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत गुणवंताचा गुणगौरव तर संघटनेच्या विविध शाखांवर युवकांची नियुक्तीही करण्यात येणार आहे. यात अनिल गोरख कुंभार यांची जिल्ह्याच्या युवा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेकडून देण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे समाज बांधवांसह विविध संस्थांन व मित्र परिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# रायपूर बारी जवळ अपघात; पिता-पुत्र ठार

**साक्री ।** तालुक्यातील रायपूर बारी येथील आवळ्या जावळ्या डोंगरजवळ भरधाव वेगातील मोटारसायकलने (एमएच ३९ एके ९२०८) पुढे चालणाऱ्या कारला (एमएच १८ बीआर ७२५२ ) धडक दिली. या अपघातात मोटारसायकल चालक जेकमसिंग गोमा वसावे, गोविंद जेकमसिंग वसावे हे दोघे ठार झाले. दुपारच्या वेळी हा अपघात झाला. या प्रकरणी कार चालक प्रमोद मधुकर त बागुल (वय ३०, रा. साक्री) यांच्या तक्रारीवरुन अपघाताला कारणीभूत ठरलेला चालक मृत जेकमसिंग याच्या विरोधात निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदला.

# होळनांथे पटेल सीबीएसई स्कूल मध्ये पालक अभिमुखता कार्यक्रम संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

होळनांथे येथे आर. सी. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये पालक अभिमुखता कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

मुख्याध्यापिका सौ. भूमिका गर्ग यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात देवी शारदेच्या पूजनाने करून इयत्ता पहिली ते आठवी व नववी ते दहावी असे दोन गटांमध्ये पालकांना ३ व ४ जुलै रोजी शाळेत आमंत्रित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या समस्या, त्यांची प्रगती, पालक व शिक्षक यांच्यातील विचारांचे देवाण-घेवाण इत्यादी या सभेचे उद्दिष्टये होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद जगताप यांनी केले. आभार रितेश मिश्रा यांनी मानले.

मुख्याध्यापिका श्रीमती भूमिका गर्ग यांनी ओरिएंटेशन म्हणजे काय त्यानंतर शाळेबद्दल विविध प्रकल्प, पोर्टफोलिओ त्यानंतर परीक्षा पद्धती खेळ विषयक इ. बाबतीत पालकांशी चर्चा करून त्यांचे प्रश्न समजून घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# शेवटच्या पाच महिन्यात तरी न्याय द्या : किरण अहिरराव

**धुळे । प्रतिनिधी**

नगरसेवक म्हणून निवडून येवून आम्हाला साडेचार वर्ष झाली. हद्दवाढ गावांकडे पुर्णपणेदुर्लक्ष झाले आहे. निवडणुकीला अवघे पाच महिने बाकी आहे.

आता शेवटच्या पाच महिन्यात तरी हद्दवाढ गावांना न्याय द्या,असे म्हणत हद्दवाढ गावातील नगरसेवक किरण अहिरराव यांनी प्रशासनाचे कान टोचले. स्थायी

समितीच्या आजच्या साप्ताहिक सभेच्या सुरुवातीला प्रथम महापौर भगवान करनकाळ यांच्या सौभाग्यवती मिनाबाई करनकाळ आणि भाजपा नेते मनोहर भदाणे यांच्या मातोश्री सुशिलाबाई भदाणे यांचे निधन झाल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी गजेंद्र अंपळकर यांची निवड झाल्याने सभापती सौ.किरण कुलेवार यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला.तो मंजुर करण्यात आला.



स्वच्छ भारत अभियांनातर्गत नविन वाहन खरेदी करण्याच्या विषय क्र.११७ वर सभागृहात चर्चा सुरु होती. हे वाहन कचरा डेपोच्या ठिकाणी वापरले जाणार होते.

नगरसेवक किरण अहिरराव म्हणाले की,या दोन टिपर वाहनांचा उपयोगआमच्या प्रभागात होवू द्या, गेल्या साडेचार वर्षात कचरा संकलनासाठी माझ्या प्रभागातील महिंदळे शिवारात एकदाही ट्रॅक्टर आले नाही. या गाड्यातरीप्रभागात येवू द्या,३१ मार्च पूर्वी वाहन खरेदी करणे गरजेचे होते,अन्यथा निधी परत गेला असता असे शासन निर्देश आहे. असे प्रशासनाचे म्हणणे आहे. तर मग माझ्या प्रभागातील किमान साडेचार वर्षानंतर तरी कचरा उचलण्याबाबत काही शासन निर्देश आहेत का? असा सवाल करत अहिरराव यांनी महापालिका प्रशासनाला चिमटा काढला. वाहन खरेदीच्या विषयावर साबीर शेख म्हणाले की, हि वाहने खरेदी करतात, परंतु डॉग व्हॅनचे काय? सभापती किरण कुलेवार ह्या सदस्य असताना नेहमी मोकाट कुत्र्यांचा प्रश्न मांडायच्या. आता काय झाले? गेल्या दोन वर्षांपासून या प्रश्नावर टोलवा टोलवी सुरु आहे. साबीर शेख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना अतिरिक्त आयुक्त सनेर म्हणाले की, कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाच्या प्रश्नामध्ये काही तांत्रिक अडचणी आहेत, परंतु कुत्र्यांचा बंदोबस्त विनामुल्य होणार आहे, काही स्वयंसेवी संस्था स्वतः भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणार असल्याचे सनेर म्हणाले. विषय क्र.१२० हा महापौरांच्या वाहन खरेदीचा होता. त्यावर माजी सभापती सुनिल बैसाणे म्हणाले की, महापौरांसोबतच उपमहापौर, स्थायी समिती सभापती आणि मनपातील काही अधिकार्यांना वाहनांची गरज आहे. त्यामुळे सर्वांसाठी वाहन खरेदी करायला हवे. त्यावर सभापती सौ. कुलेवार यांनी महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहुन निर्णय घेवू असे सांगितले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited ‘B’ Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

शनिवार, दि. २२ जुलै २०२३






# पीएसआय अभिजित रवींद्र इंगळेंचा पत्रकार भवनात झाला जंगी सत्कार











धुळे।

जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, जेष्ठ पत्रकार रवींद्र इंगळे यांचे सुपुत्र अभिजित इंगळे यांनी एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून पीएसआय पदाला गवसणी घातली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील पत्रकाराचा मुलगा पीएसआय होणे ही बाब पत्रकारसृष्टीला स्वाभाविकच अभिमानास्पद व गौरवाची आहे. या उदात्त भावनेतून धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवनात पीएसआय अभिजित इंगळे यांचा जाहीर सत्कार समारंभ मोठ्या पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, भाजपचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपलकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार बापू ठाकूर, योगेंद्र जुनागडे, दिलीप विभांडीक, निखिल सूर्यवंशी, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, चंद्रशेखर पाटील, मिलिंद बैसाणे, विद्यमान उपाध्यक्ष मनोज गर्दे व इतर मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार देऊन पीएसआय अभिजित इंगळे यांचा जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी अभिजीतच्या आईवडील आणि यूपीएससी परीक्षेची तयारी करीत असलेल्या बहिणीसह सर्व इंगळे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाला सेवानिवृत्त अभियंता विजय मंगळे, वंचितचे राज चव्हाण, संदेश भूमीचे प्रणेते आनंद सैंदाणे, प्रा. संप्रती बैसाणे, संजय अहिरे, जेष्ठ पत्रकार प्रा. मोहन मोरे, नरेश रावताला, आदेश कुलकर्णी, श्रीकृष्ण बेडसे, भाग्यश्री बैसाणे, पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष अतुल पाटील, प्रांतिक प्रतिनिधी तुषार बाफना, कार्यकारिणी सदस्य प्रकाश शिरसाठ, पुरुषोत्तम पाटील, सुनील बैसाणे, आकाश सोनवणे, दीपक शिंदे, सोपान देसले, गोरख गर्दे, भास्कर फुलपगारे, सिद्धार्थ मोरे आदी पत्रकारांसह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

शनिवार, दि. २२ जुलै २०२३





# कचरा डेपो व गांडूळ खत प्रकल्पाची महापौरांनी केली पाहणी














धुळे । शहरातील वरखेडी रोड येथे कचरा डेपो व मनपा मालकीचा गांडूळ खत प्रकल्पाच्या कामाची पाहणी महापौर प्रतिभा शिवाजीराव चौधरी यांनी केली. कचऱ्याची विल्हेवाट योग्यप्रकारे करण्यासाठी नियोजन व त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे ही आदेशित करण्यात आले. याप्रसंगी आयुक्त श्री.देविदास टेकाळे, माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर यांची प्रमुख उपस्थित होती.मनपा मालकीच्या कचरा डेपोवरील वस्तूस्थिती व परिस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीकोनातून सदर पाहणीचे आयोजन करण्यात आलेले होते. याठिकाणी असलेल्या कचरा टाकण्यासाठी उपलब्ध जागा, कचऱ्यावर होणारी प्रक्रिया याबाबत माहिती घेवून यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचे आदेश महापौर प्रतिभा चौधरी यांनी संबंधितांना दिले. कचऱ्याची विल्हेवाट योग्यप्रकारे करण्यासाठी नियोजन व त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे ही आदेशित करण्यात आले.या पाहणी प्रसंगी अति.आयुक्त विजय सनेर, मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, चंद्रकांत जाधव स्वच्छता निरीक्षक विकास साळवे गांडूळ खत प्रमुख रविंद्र जाधव हे सर्व उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ